# नातीगोती

दोन बिंदू जोडणारी एक रेषा म्हणजे नातं असं मला वाटतं – आणि गोतं – म्हणजे गोतावळा – नातं आणि गोतावळा यातूनच नातीगोती माणसाच्या जन्मापासून जोडली जातात. म्हणूनच बाळाला जन्म देणारी ती 'आई' आणि त्याची काळजी वाहणारे ते वडिल, असं नातं निर्माण झालं असावं. अशी जन्मापासून नातीगोती येतात आणि मृत्यूनंतर सुद्धा ती टिकून असतात. नातं आणि नातेवाईकांचं स्थान माणसाच्या जीवनात महत्त्वपूर्ण आहे. आणि त्याची वीण अधिक घट्ट करण्याची गरज सुद्धा आहे. नातं हा शब्दच आशयपूर्ण आहे. जे तुटत नाही ते नातं – परंतु जे मानले जात नाही – त्याची कारणे – परिस्थितीजन्य – व्यक्तीपरत्वे अशी असतात.

कांही वेळा आपण रक्तात असलेली नाती – मानत नाही – पण कांही वेळा – नसलेली नाती जोडली जातात. पण मग यापैकी श्रेष्ठ नातं कोणतं? रक्ताचं की जोडलेलं? सहवास – एकटेपणा – प्रेम-भावना – सेवा – परोपकार धर्म – यातून काही वेळेस नातं निर्माण होतं – अशी नाती टिकविण्यासाठी गरज आहे ती उदार मनाची आणि समजूतदार पणाची. कांही वेळेस धर्म अधर्म होतो तर कांहीवेळा अधर्म धर्म होऊ शकतो.

एकत्र कुटुंबात – आईवडिल – आजीआजोबांची सेवा – थोरांना मानाचं पान देणं – हे आपण कर्तव्यबुद्धीनं करतोच – आजकाल विभक्त कुटुंबात – स्वातंत्र्य – स्वतंत्रता – स्त्री-मुक्ती अशा कल्पनांमुळे नातं ह्या संकल्पनेला तडा पडू लागल्या आहेत – तरीदेखील नातं आणि नातेवाईक अशा नाण्याच्या दोन्ही बाजू जपणे हे क्रमप्राप्त आहे. उदा. – धार्मिक कार्यात – लग्नकार्यात वधूवरांना – थोरांचा आशीर्वाद – थोरांना नमस्कार करणे. जसे महत्त्वाचे – तसेच त्यांचे कौतुक करण्यासाठी – नातेवाईक पण लागतात. ते नसतीलच किंवा जोडले नसतील – तुटले असतील तर शुभाशीर्वाद कोण देईल? जसं तिखट अन्नपदार्थासाठी – मीठ – मिरची – मसाला आवश्यक – तसंच साखर – गुळाशिवाय गोड पदार्थ – या दोन्ही पदार्थांना चविष्टपणा नाही. म्हणूनच नातं आणि नातेवाईक यांच्याशिवाय कशालाच शोभा नाही.

रक्ताची नाती हृदयस्पर्शी तर जोडलेली नाती आपुलकीची असतात. उदा. आपल्यावर आलेल्या अपरिहार्य परिस्थितीत –

नेहमीच - जोडलेलं आपुलकीचं नातंच - प्रथम मदतीला धावून येतं - हे परिस्थितीजन्य नातं - कधीच तुटत नाही. म्हणूनच ते अतूट असतं. पण रक्ताचं नातं मात्र जन्मांतरीचं असतं. ते परमेश्वरानीच ऋणसंबंध जोडलेलं असतं. हे माना किंवा मानू नका - पण असं नातं नाळेच्या धाग्यांनी जोडलेल्या जिव्हाळ्याच्या पलिकडील असतं. काळ्या पाषाणावर ओढलेली पांढरी रेघ - पुसली तरी पुसणार नाही. ती परमेश्वराची रेघ आहे.

आता असा प्रश्न पडतो की, सहवास - आपुलकी - एकरूपपणा - सेवा - मदत - प्रेम - इत्यादि वेगवेगळ्या रंगांची लोकर आणि रक्तवर्णी एक लोकर - यांनी उलटसुलट टाक्यांनी विणलेली सुंदर कलाकृती आवडेल - उलटसुई म्हणजेच जोडलेले नाते तर सुलट सुई म्हणजे रक्ताचं नातं - शब्दांच्या पलिकडचं - मर्मबंधातलं.

कुटुंबाचं नातं हे गुरुशिष्याचं नातं असतं - जोडलेलं नातं आपुलकीचं असतं - आता आपणच ठरवायचं आहे - श्रेष्ठ नातं कोणतं? मग याचं उत्तर - तुम्हीच शोधा - नक्की सापडेल.



श्रीमती मेधा आसरकर
(संकलीत)

